बुधवार दि.२ ऑक्टोबर २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०२ अंक : ३०

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत

संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in


# खरीप २०23 ची पीक विमा रक्कम लवकरच शेतकऱ्यांना मिळणार

## राज्य शासनाकडून १९२७.५२ निधीची तरतूद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नागपूर (वृत्तसंस्था)

खरीप २०२३ हंगामातील थकित पीक विमा रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यासाठी राज्य शासनाने १९२७.५२ निधीची तरतूद केली आहे. स्वतंत्र भारत पक्षाने केलेला पाठपुरावा व आंदोलनाला मोठे यश मिळाले आहे अशी माहिती, स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी दिली आहे.

खरीप २०२३ या हंगामात दुष्काळ सदृष्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले होते. मात्र दीड वर्ष होऊन गेले तरी विमा कंपनीकडून पीक विम्याचे पैसे मिळत नसल्यामुळे स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेने अनेक आंदोलने केली. एक ऑगस्ट २०२४ रोजी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा आंदोलन करण्यात आले होते. ९ सप्टेंबर रोजी पुणे येथील कृषी आयुक्त कार्यालयावर मोर्चा नेला होता. या मोर्चात, पैसे न मिळाल्यास राजकीय पुढाऱ्यांना गावातील सभेत जाब विचारण्याचे' आंदोलन जाहीर केले होते. त्याचा परिणाम झाला व ३० सप्टेंबर २०२४ रोजी राज्य शासनाने, शासन निर्णय करून फक्त ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीची थकबाकी अदा करण्यासाठी १९२७.५२ कोटी रुपयाची आर्थिक तरतूद केली आहे.कृषी आयुक्त कार्यालयाला सदरची रक्कम त्वरित वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहे. सदरची रक्कम लेखा परीक्षा विभागाकडे, ॲग्रिकल्चर इन्शुरन्स कंपनीद्वारे ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडून वर्ग करण्यात येईल. या निर्णयाचा फायदा नाशिक, नगर, सातारा, सोलापूर, चंद्रपूर, व जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. आठ ते दहा दिवसात विम्याची थकीत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल अशी माहिती ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे विभागीय प्रबंधक दीक्षित यांनी घनवट यांना दिली.



# कंधार तालुक्यातील उस्माननगर चौकात एकनाथ दादा पवार यांचे जंगी स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे



शिवसेना महाराष्ट्र राज्य संघटक ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भावी आमदार एकनाथ दादा पवार यांचे उस्माननगर येथील चौकात फळ फटक्याची आतीशबाजी करून भव्य सत्कार करण्यात आला .

नांदेड येथून लोह्याकडे मोटारसायकलच्या ताफ्यासह मतदारसंघातील कार्यकर्त्यांना व मतदारांची सदिच्छा भेटी गाठी दरम्यान उस्माननगर चौकातून लोह्याकडे जाताना येथे स्वागत करण्यात आले

यावेळी युवा सेना तालुकाप्रमुख संदीप पाटील काळम उप तालुकाप्रमुख हनुमंत पोकले,युवा सेना उपतालुकाप्रमुख विलास गिरी, सर्कल प्रमुख दादाराव पाटील मोरे,युवा सेना शिराढोण सर्कल प्रमुख संतोष पाटील घोरबांड , लक्ष्मीकांत पाटील घोरबांड,गणप्रमुख संतोष कपाळे,हळदा गणप्रमुख बळवंत पाटील शिंदे,शिराढोण शाखाप्रमुख शिवा भुरे, शिराढोण तांडा शाखाप्रमुख सुदाम पवार,सोशल मीडिया सर्कल प्रमुख संदीप पवळे चिखलीकर,शिराढोण येथील युवा कार्यकर्ते भीमाशंकर कंधारे माधव करंडे मनोज कांबळे तांडा येथील बाबू आडे रवी पवार लाडका येथील ओमकार पाटील शिंदे भुतेचेवाडी येथील निरंजन जमदाडे उस्माननगर येथील शिवाजी पाटील काळम संतोष पाटील कळम अंकुश घोरबांड बापूजी घोरबांड शाम कळम वैभव कळम कृष्णा काळम इलाज भाई फकीर जावेद शेख विठ्ठल माली पाटील हनुमंत मोरे व असंख्य कार्यकर्त्यांच्या हस्ते एकनाथ दादा पवार यांचे सत्कार करण्यात आला.

# जिल्हा परिषद खेतमाळीसमळा शाळेतील विद्यार्थ्यांच्या हातात टॅब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



इंग्रजी शाळांच्या तुलनेत झेडपीच्या शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आता सकारात्मक होत आहे. दिवसेंदिवस शाळेतील पटसंख्या वाढत आहे. इन्फोसिस कंपनी व जिल्हा परिषद अहमदनगरचे आदरणीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आशिष येरेकर साहेब , मा.शिक्षणाधिकारी श्री भास्कर पाटील साहेब तसेच लेखाअधिकारी श्री रमेश कासार साहेब यांच्या विशेष प्रयत्नातून मिशन आपुलकी अंतर्गत इन्फोसिस कंपनीतर्फे जिल्हा परिषद खेतमाळीसमळा शाळेस २० टॅब प्राप्त झाले. या टॅब चे उद्घाटन मंगळवार दिनांक १ ऑक्टोबर रोजी खेतमाळीसमळा शाळेत आदरणीय गटशिक्षणाधिकारी श्री सत्यजित मच्छिंद्र साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ विस्तारअधिकारी श्री निळकंठ बोरुडे साहेब ,श्री भुजबळ साहेब, केंद्रप्रमुख श्री रमेश पाटोळे साहेब व नगरसेवक श्री शहाजीभाऊ खेतमाळीस तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री शहाजी शिंदे, उपाध्यक्ष सौ प्रतिभा डाके व सर्व पालकांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री माधव बनसुडे, सामाजिक कार्यकर्ते श्री गोरख भाऊ आळेकर, श्री सचिन पांढरकर, रोहिदास अण्णा सुपेकर ,समीर पांढरकर सर, शिवसेना नेते श्री किरण बनसुडे, युवा नेते मयूर बनसुडे ,राजू दादा बनसुडे ,श्री अंबर अण्णा शिंदे ,श्री दीपक खेतमाळीस, श्री संदीप चाकणे, श्री नवनाथ खेतमाळीस ,श्री मधुकर गोरखे तसेच शाळेतील सर्व माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते .उद्घाटन प्रसंगी अनेक मान्यवरांची भाषणे झाली. या टॅब चां उद्देश पुर्ण करण्यासाठी आम्ही यशस्वी प्रयत्न करणार असल्याचे शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणारे मुख्याध्यापक श्री शरद तरटे सर व श्री सुधीर तरटे सर यांनी यावेळी सांगितले.शाळेला भौतिक सुविधा मिळवून देणाऱ्या सर्व अधिकारी व पालक यांचे यावेळी त्यांनी आभार मानले.

# एमपीएससी उत्तीर्ण आनंद जांभळे यांचा लसाकमच्या वतीने सन्मान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नायगाव । प्रतिनिधी

मौजे एकलारा येथील एमपीएससी पास झालेले व ज्यांचा महाराष्ट्रामध्ये अनु सूचित जाती मध्ये एकोणविसावी(१९) रँक घेऊन उत्तीर्ण झालेले मौजे एकलारा येथील आनंदराव नामदेवराव जांभळे यांची वर्ग दोन पदी निवड झाल्याबद्दल नायगाव येथील लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ व समाज बांधव यांच्या वतीने श्री बैल के बि डी यांच्या निवासस्थानी त्यांचा प्राध्यापक डॉक्टर शंकरराव गड्डमवार त्यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला याप्रसंगी श्री रा ना मेटकर सर श्री शंकरावजी माळगे सोपानरावजी देगावकर प्राध्यापक मनुरे सर रवींद्र जी भालेराव यांनी आपले मत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक भीमराव बेलके यांनी मांडले तर आभार बापूराव गाय कवाड सरांनी मांडले याप्रसंगी सी जी डोईवाड एस आर पवार सोपानराव देगावकर सुरेश वाघमारे पत्रकार तानाजी शेळगावकर एन. सी.झुंजारे मनोहरराव वाघमारे डॉ प्रभाकर गायकवाड अँड बी एम वाघमारे राजकुंडल माधवराव प्रमोद घनटेवाड प्रवीन वाघमारे मनोज गायकवाड नामाकर हनमतं जयवंत नामाकर संदिप सोनकांबळे संजय सकळे विलास झुजोरे आदि उपस्थित होते.

# जि.प.म.प्राथ.शाळा येवतीस दोन संगणक संच भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

लोणार तालुक्यातील येवती गावचे सुपुत्र तथा फुलंब्री, जि.छ. संभाजीनगर येथील नामांकित बालरोग तज्ञ डॉक्टर गणेश साहेबराव डोईफोडे यांनी जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा येवती येथील विद्यार्थ्यांना संगणकाची मूलभूत माहिती व्हावी या उद्देशाने दोन संगणक संच भेट स्वरूपात दिले.

डॉ.गणेश साहेबराव डोईफोडे हे येवती शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ.विमल साहेबराव डोईफोडे यांचे सुपुत्र आहेत तसेच ते जि. प. म.शाळा येवतीचे माजी विद्यार्थी देखील आहेत. डॉक्टर गणेश डोईफोडे यांनी शाळेप्रती दाखविलेल्या तळमळीची दखल घेत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री शिवानंद आश्रुजी सानप यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला सदर कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री समाधान कायंदे तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ. विमल डोईफोडे मॅडम उपस्थित होत्या.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक श्री पृथ्वीराज भंडारे यांनी केले तर शाळेतील शिक्षक वृंद श्री सु.रा पालकर ,कु.अ.स देशमुख मॅडम,श्री. सं.वि. चव्हाण यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.



## व्हि.पी.के.ॲग्रो फूड प्रॉडक्ट लि.प्रयागनगर सिंधी येथे

# बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ व गव्हाण पुजन गळीत हंगाम २०२४-२५

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

व्हि.पी.के.ॲग्रो फुड प्रॉडक्ट लि.प्रयागनगर सिंधी ता उमरी जि नांदेड या कारखान्याचा ८ वा गळीत हंगाम २०२४-२५ चा बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ सोहळा दि.०३/१०/२०२४ रोज गुरूवार सकाळी ठिक ११:२१ मिनिटांनी खालील गुरूवर्य व मान्यवरांच्या हस्ते आयोजित केला आहे.

प.पु.प.म.श्री.श्री.श्री.१०८ महंत यदुबन गुरू गंभीरबन महाराज श्री.दत्त संस्थान मठ कोलंबी,प.पु.श्री.आनंदपुरी गुरू दत्तपुरी महाराज श्री.दत्त संस्थान चोळाखा यांच्या शुभ आशिर्वादाने ,मा.श्री.बापुजी धोंडीराम पा.कदम त्यांच्या सुविध्द पत्नी प्रगतशील शेतकरी मौ.शेलगांव ता उमरी ,मा.श्री.मारोतराव व्यंकटराव पाटील कवळे गुरुजी संस्थापक अध्यक्ष व्हि.पी.के.उद्योग समूह यांच्या शुभहस्ते गव्हाण पुजन समारंभ गुरूवार दि.३ आक्टोबर २०२४ दुपारी १२:३१ वाजता मा.श्री.प्रभाकर दिंगबरराव पुयेड प्रगतीशील शेतकरी मौ.सिंधी ,मा.श्री.गोविंद प्रल्हाद पा.ढगे प्रगतीशील शेतकरी वजीरगांव ता.नायगांव तसेच वरील सर्व संत, महंत, मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होत आहे तरी सर्व शेतकरी, सभासद, अधिकारी, कर्मचारी,ठेकेदार, कामगार यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन संचालक, कार्यकारी संचालक व्हि.पी.के.उद्योग समूह यांनी केले आहे.

झाडे लावा झाडे जगवा



## चारोळी

सत्य अहिंसेच्या मार्ग
आपुनी सारे धरुया
गांधीजीचा मंत्र जपू अन
वंचितासाठी हात पुढे करूया.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# जातीजातींमध्ये तेढ निर्माण करणे योग्य नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कोल्हापूर (वृत्तसंस्था)

भाजप आमदार नीतेश राणे यांच्या वादग्रस्त वक्तव्यावरून मंत्री उदय सामंत यांनी भाष्य केले आहे. अमरावतीतील अचलपूर पोलिस ठाण्यात नीतेश राणे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याप्रकरणी उदय सामंत यांनी प्रश्न विचारला असता, त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला की नाही, मला माहीत नाही. जाती जातींमध्ये तेढ निर्माण करणे योग्य नाही, असा सल्ला स्वामीजींना दिला आहे. हा सल्ला प्रत्येकाने तंतोतंत पाळला पाहिजे, अशी प्रतिक्रिया उदय सामंत यांनी दिली आहे. ते कोल्हापूर येथे माध्यमांशी बोलत होते.

मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी कोल्हापूर येथील कन्हेरी मठात महाराष्ट्रातील संत महंत, धर्माचार्य यांच्या 'संत समावेश' कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली होती . कार्यक्रम झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

# मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत उद्दिष्टे वाढवून पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळवून द्यावा-नागनाथ माळगे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने

पंतप्रधान मोदी आवास योजना अंतर्गत धर्माबाद तालुक्यामध्ये अनेक लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळाला पण तयातीलच काही लाभार्थ्यांना मुदतीच्या आत जातीचे प्रमाणपत्र राशन कार्ड व इतर आवश्यक कागदपत्र गोळा करण्यासाठी विलंब झाला त्यामुळे घरकुलासाठी आवश्यक असणारी कागदपत्र ठराविक कालावधी गोळा करून संबंधित ग्रामपंचायतिकडे जमा केले नसल्याने तालुक्यातील अनेक पात्र लाभार्थी हे घरकुलापासून वंचित राहिले आहेत

त्या करिता चालु वर्षात पंतप्रधान मोदी आवास योजनेची तालुक्यातील उद्दिष्टे म्हणजे जेवढे घरकुल आलेली आहेत, त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी रोशनगावचे उपसरपंच प्रतिनिधी तथा सामाजिक कार्यकर्ते नागनाथ पाटील माळगे व पत्रकार दत्तात्रय सज्जन यांनी आज रोजी एका लेखी निवेदनाद्वारे केले आहेत

ग्रामीण भागातील नागरिकांना व गौरगरिबांना आपल्या हक्काचे पक्के घर असावे यासाठी शासनाने मोदी आवास घरकुल योजना ही राबवली जात आहे त्यासाठी शासनाकडून अनुदानही दिले जात आहे धर्माबाद तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना मोदी आवास योजना अंतर्गत तालुक्यांमध्ये उद्दिष्टे वाढवून वंचित लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा गटविकास अधिकारी प्रफुल तोटेवाड यांच्याकडे नागनाथ माळगे व दत्तात्रेय शंकर सज्जन यांनी मागणी केली आहे.

# अंदमान च्या बेटा वरून






लेखक ✻ धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर

**अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या सिद्धहस्त लेखन शैलीतून रोमांचकारी असणारा अंदमान टूर चा रोज चा वृत्तांत याच ठिकाणी दररोज प्रसिद्ध करण्यात येणार आहे. कृपया वाचकांनी प्रतिसाद द्यावा ही विनंती. – संपादक**

(भाग ७)

लोकनेता न्यूज नेटवर्क

पृथ्वीवर असलेल्या दळणवळणाच्या सर्व साधनाचा वापर अंदमान टूर मध्ये झालेला आहे.नांदेड हैद्राबाद नांदेड रेल्वे प्रवास,हैद्राबाद श्री विजयपुरम हैद्राबाद विमान प्रवास,श्री विजयपुरम इतर बेटांना जातायेतांना केलेला क्रुझ, स्टिमर,स्पीड बोटचा प्रवास,बारतांग ला जाता येताना केलेला रस्त्याचा वापर,समुद्रातील जीवन सृष्टी पाहण्यासाठी पाण्याखालून सब मरीन ने मारलेला फेरफटका आणि चुनखडी च्या गुहा पाहण्यासाठी जंगलात केलेली अडीच किलोमीटर ची पायपिट यामुळे जल, भूमी,आकाश या तिन्ही ठिकाणी विहार झालेला आहे. रात्री दोन वाजता वेक अप कॉल ने उठल्या नंतर एका तासात सर्व जण तय्यार झाले.ब्रेकफास्ट ची पार्सल ची सुविधा उपलब्ध होती.तीन वाजता आम्ही चार एसी टेम्पो ट्रॅव्हल्स ने बारातंग कडे कूच केली.५० किमी अंतर दीड तासात पूर्ण करून जिकराम चेक पोस्ट ला पोंहचलो.सर्व वाहने रांगेत लावण्यात येत होती.येथून पुढचा प्रवास जारवा आदिवासी जंगलातून जाणार असल्यामुळे पोलीस ताफ्यात जावे लागते.आधार कार्ड सहित नावाची लिस्ट व इतर फॉर्मीलिटी पूर्ण केल्या.पहाटे सहा वाजता कानव्हे सुटणार असल्यामुळे बराच वेळ शिल्लक होता. टपरी वर गरमागरम चहा कॉफी चा आस्वाद घेतला.काहींनी बाजूला असलेल्या मंदिरात जावून गणपती व दुर्गेचे दर्शन घेतले.

बरोबर सहा वाजता शंभर च्या वर वाहनाचा ताफा पोलीस बंदोबस्तात सुसाट निघाला. घनदाट जंगलात आणखी ५५ किलोमिटर चे अंतर पुर्ण करायचे होते.जारवा आदिवासी पाहण्याची उत्सुकता अतिशय तीव्र होती.सुप्रीम कोर्टाच्या निर्देशा मुळे या भागात आदिवासींचे फोटो काढण्यास सक्त मनाई होती.अर्धे अंतर पूर्ण झाले तरी आदिवासी काही दिसेचनात.त्यामुळे निराशा वाढत होती.वाहन चालक गोपाल आश्वत करत होता की,जंगली जारवा आदिवासी जरूर दिसतील.पण जंगल संपत असल्यामुळे आमचा धीर सुटत चालला होता.तेवढ्यात ड्रायव्हर जोरात ओरडला.आम्ही उत्सुकते पोटी समोर पाहिले.तोंडाला पांढरा रंग फासलेली तीन जारवा आदिवासी मुले रस्त्याच्या कडेला फक्त चड्डीवर बसलेली होती.ड्रायव्हरला गाडी स्लो करण्यास सांगितली.पण त्याने नकार दिला.गाडी मुद्दाम थांबविली तर ५००० रुपये दंड व एक महिन्यासाठी सिज करण्यात येते असे त्यांने सांगितल्यामुळे आम्ही फोर्स केला नाही.मिडलस्टेट जेट्टी वर पोहचल्यानंतर आम्ही टेंपो ट्रॅव्हल मधून खाली उतरलो. मोठ्या स्टीमर मधून आम्ही बारतांग ला जाण्यासाठी निघालो.या मोठ्या बोटीत प्रवाशांची व वाहनांची गर्दी होती.तेवढ्यात माझे लक्ष किनाऱ्याकडे गेले.दोन छोट्या होडीतून प्रत्येकी तीन तीन जारवा आदिवासी शिकारी साठी जात होते.ही माहिती सर्वांना दिली.आदिवासी जंगली माणसांना स्पष्टपणे पाहता आल्यामुळे सर्वांचे समाधान झाले.

मिडल स्टेट ते बारतांगला समुद्रातून जाण्यासाठी १५ मिनिटे लागली.१० जणांचे सहा ग्रुप करून अल्फा, बीटा, चार्ली,डेल्टा, इको, फॉक्सट्रोक असे नाव दिले.प्रत्येक ग्रुप च्या कॅप्टन वर सर्वांना एकत्रीत ठेवण्याची जबाबदारी दिली. येथून पुढचा आमचा प्रवास होणार होता स्पीड बोट ने. टेन प्लस टू ची कॅपॅसिटी असलेल्या या स्पीड बोट ने अवघ्या पंधरा मिनिटात ३० किलोमीटर पेक्षा जास्त अंतर कापले. समुद्राच्या दोन्ही बाजूने असलेल्या गर्द झाडीतून स्पीड बोटने शेवटचे एका किलोमीटरचे अंतर पूर्ण करताना अतिशय मजा आली.लाकडी स्टॅन्ड ला आम्ही बोटीतून उतरलो. येथून बाराशे मीटर अंतर पायी चालावे लागते. घनदाट वनात केलेली पाऊलवाटेवरून जाताना आजूबाजूला झाडावर असलेल्या पक्षांचा किलबिलाट ऐकू येत होता. एखाद्या वनात सहलीला आल्यासारखे वाटत होते.जगप्रसिद्ध असलेली चुनखडी गुहा पाहिल्यानंतर चालल्यानंतर आलेल्या श्रमाचे काहीच वाटले नाही. निसर्गनिर्मित अंधाऱ्या गुहेत प्रवेश करताना थोडी भीती वाटते. गाईडच्या बॅटरीचा प्रकाशात निसर्गाच्या किमयेची प्रचिती येते.आपोआपच तयार झालेल्या या कलाकृतीमध्ये गणपती,हत्ती, शंख, गदा यासारख्या असंख्य वस्तू दिसतात. अशा प्रकारची अनोखी गुहा मी पहिल्यांदाच पाहिलेली आहे. अर्ध्या तासानंतर या स्वप्ननगरीतून बाहेर आलो. लिंबू सरबत घेऊन परत पायी चालणे सुरू केले. त्यानंतर स्पीड बोटने आम्ही बारतंग ला पोहोचलो. इथून टाटा सुमो करून भारतातील एकमेवचिखल ज्वालामुखीच्या ठिकाणी गेलो.थोडे चालून टेकडीवर गेलो असता थंड ज्वालामुखी दिसला. हे मातीचे ज्वालामुखी तुरळकपणे उद्रेक झालेले आहेत. स्थानिक लोक यालाजलकीम्हणतात .नारकोंडम ज्वालामुखी ज्यालाभारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणानेसुप्त ज्वालामुखी म्हणून वर्गीकृत केले आहे.जेवणाची वेळ झाली असल्यामुळे बारतंगलाच हॉटेलमध्ये साधे जेवण केले. कमी मालमसाला वापरून तयार केलेले पदार्थ चविष्ट होते.जेवल्यानंत परतीच्या प्रवासासाठी मोठी बोट येईपर्यंत जेटीवरच थांबावे लागले. पंधरा मिनिटांची समुद्री सफर करून आम्ही पोलिसांच्या ताफ्यात परतीचा प्रवास सुरू केला. जंगलात बराच वेळ वाट पाहून देखील रस्त्यात कुठेही

आदिवासी दिसले नाहीत. मोबाईलची रेंज आल्यानंतर माझ्या गुगल पे वर वीस हजार रुपये जमा झाल्याचा मेसेज आला. अमरनाथ यात्रेकरू आनंद साताळे यांनी आगामी अंदमान टूरसाठी दोन व्यक्तींचे आडवांस बुकिंग पाठवले होते. जानेवारी २०२५ मध्ये दुसरा अंदमान टूर काढण्याचा नुसता सुतोवाच या लेखमालेतून केला होता. सहलीची निश्चित तारीख ही पक्की झाली नव्हती तसेच अंदमान टूरचे पोम्प्लेट देखील काढले नव्हते. तरीदेखील दोन बुकिंग झाल्याचे पाहून सर्वजण चकित झाले. हा एक शुभ संकेतच मानावा लागेल. रात्री सातच्या सुमारास आम्ही हॉटेलला परतलो. दिवसभराच्या दगदगीमुळे आलेला शिन गरम पाण्याने मनसोक्त आंघोळ केल्यामुळे निघून गेला. फ्रेश होऊन रात्रीच्या भोजनात असलेल्या खिचडी,कडी,भजे, मालपोहा सह बनवलेल्या वेगवेगळ्या पदार्थांचा आस्वाद येऊन झोपी गेलो.(क्रमशः)

# विमा कंपनीकडून शेतकऱ्यांची थट्टा;२६ दिवसा नंतर पाहणी करण्यास आले विमा प्रतिनिधी गावांत

## अतिवृष्टीच्या पाहणीची विमा कंपनीला महिनाभराने आली जाग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील बारूळ,मजरे वरवंट शिवारात १ आणि २ सप्टेंबर असे सलग दोन दिवस अतिवृष्टीमुळे परिसरातील जवळपास दोन हजार शेतकऱ्यांच्या शेतातील कापूस, सोयाबीन,मूग,उडीद पिकाचे, नुकसान झाले होते. शासनाच्या निर्देशानुसार ७२ तासांच्या आत १९४७ शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रारी नोंदविल्या; परंतु त्याच्या तब्बल २६ दिवसांनंतर पीक विमा कंपनीला या गावात नुकसानीची पाहणी करण्याची जाग आली.

सोमवारी गावांत आलेल्या पीक विमा कंपनीचे प्रतिनिधी फक्त १२ शेतकऱ्यांच्या नावाची यादी घेऊन आल्याने शेतकरी संतप्त झाले. त्यामुळे कंपनीच्या कर्मचाऱ्यांना गावातून काढता पाय घ्यावा लागला.जिल्ह्यात १ आणि २ सप्टेंबरला अनेक मंडळांत अतिवृष्टीची नोंद करण्यात आली.शासनाने नुकसानीची माहिती पीक विमा कंपनीला ७२ तासांच्या आत कळवावे, असे बंधन टाकले. त्यानुसार बारूळ परिसरातील १९४७ शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीकडे ऑनलाइन नोंदी केल्या. एक ते दोन दिवसांत पीक विमा कंपनीचे कर्मचारी गावात नुकसानीची पाहणी करण्यासाठी येतील अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती; परंतु तब्बल २६ दिवसांनंतर पीक विमा कंपनीचे कर्मचारी गावात प्रकटले. यावेळी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी आपल्यासोबत केवळ १२ शेतकऱ्यांच्या नावाची यादी आणली होती.

परंतु सदरील विमा कंपनीच्या प्रतिनिधी जवळ केवळ १२ शेतकऱ्यांचे नुकसानीचे पाहणी करण्याचे अर्ज घेऊन दाखल झाल्याने तक्रारीची संख्या तर १९४७ आणि कंपनी नुकसानीची पाहणी करण्यासाठी केवळ बाराच शेतकरी ? असा प्रश्न पडल्याने युनारटेड इंडीया इन्शुरन्स को.लि. प्रतिनिधींना गावकऱ्यांनी शेतकऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयच्या मध्ये सदर कंपनीला निवेदन देऊन एकाच दिवशी शेतकऱ्यांनी हजारोंच्या संख्यात तक्रारी ७२ तासाच्या आत कळवल्या पीक नुकसानीच्या आणि प्रत्यक्षांत ते पण २६ दिवसानंतर पाहणी साठी आले केवळ १२ शेतकऱ्याची नुकसानीचे सर्वेसाठी यामुळे गावकरी आले, तसे विमा कंपनी च्या प्रतिनिधीला परत करून सरसगड गावांतील नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी अशी मागणी केली आहे, जिल्हाधिकारी यांनी याकडे विशेष लक्ष घालावे अशी मागणी ही गावकऱ्यांनी केली

नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना शासनाकडून विमा दिला जातो यासाठी प्रधानमंत्री पिक विमा योजना राबवली जाते यात शेतकऱ्यांना सुरुवातीस विमा भरावा लागतो विमा भरलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास त्यांनी ७२ तासाच्या आत संबंधित कंपनीला कळवणे गरजेचे आहे, तरच शेतकऱ्यांना मदत मिळते त्यामुळे शेतकऱ्यांनी नुकसानीची तात्काळ माहिती द्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले होते, बारूळ मजरे वरवंट व चौकी पाया या परिसरात सलग २ दिवस ढगफुटी व अतिवृष्टी झाली यामध्ये पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ७२ तासाच्या आत हजारो संख्येच्या आकड्यात शेतकऱ्यांनी तक्रारी नुकसानीच्या पिक विमा कंपनीला कळवल्या एकाच दिवशी हजारोंच्या संख्येत तक्रारी करून केवळ १२ शेतकऱ्यांचे नुकसान पाहणी करण्यासाठी आलेल्या पिक विमा कंपनीला पाहणी करण्यासाठी गावकऱ्यांनी रोखून संबंधित प्रतिनिधीला या संबंधिताचा जाब विचारला यावेळी त्यांनी आमच्या कंपनीकडे सदरची माहिती कळवण्यात येईल त्यामुळे संबंध गावातील शेतकऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने विमा कंपनीला सदर दिवशी एकाच वेळेस हजारो शेतकऱ्यांच्या तक्रारी असून केवळ १२ शेतकऱ्यांची पाहणी चुकीच्या पद्धतीने होत आहे, याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# कंधारात प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावरील जीवघेणा भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध

## समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

ओबीसी संघर्ष योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर पुणे येथे जीवघेणा भ्याड हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्याचा मा.चंद्रसेन पाटील सुरनर गौंडगावकर मित्रमंडळ, लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. तसेच प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर जीवघेणा भ्याड हल्ला करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी कंधार उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.दिलेल्या निवेदनात असे नमूद केले की, सोमवारी, ३० सप्टेंबर २०२४ रोजी पुणे येथे ओबीसी संघर्ष योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर जीवघेणा भ्याड हल्ला काही समाजकंटकांनी केला आहे. प्रा.लक्ष्मण हाके हे अभ्यासू व्यक्तीमत्व आहे. त्यांना राज्यातील सामाजिक रचना, जातीय रचना, आरक्षण या विषयांचा सखोल अभ्यास आहे. यामुळे ते प्रस्थापित असलेल्या मराठा समाजाला ओबीसींतुन आरक्षण देणे योग्य नाही. हे मुद्देसुद मांडणी करत आहेत. यामुळे बिथरलेल्या समाजकंटकांनी हा हल्ला केला आहे. त्यांचा हेतु जिवे मारण्याचा होता. त्यामुळे आता ओबीसी समाज शांत बसणार नाही. हा हल्ला हाकेंवर नसून सकल ओबीसींच्या अस्मीतेवरचा हल्ला आहे.

यामुळे सकल ओबीसी समाज व चंद्रसेन पाटील सुरनर गौंडगावकर मित्र मंडळ, लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाच्या वतीने शुक्रवारी, दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता चंद्रसेन पाटील सुरनर गौंडगावकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मोर्चा माईचे मंदिर, साठेनगर कंधार येथून निघणार असून,कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.संबंधित समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी कंधार उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर चंद्रसेन पाटील सुरनर गौंडगावकर मित्र मंडळ, लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष केरबा केंद्र आदींसह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बीड नगरपरिषद प्रशासन गोट्या खेळतंय का?

# शहरातील अस्वच्छता,गटारीचे पाणी रस्त्यावर रस्त्यावरील खड्डे, मोकाट जनावरे निष्क्रिय

## नगरपरिषद प्रशासनाच्या निषेधार्थ लक्ष्यवेधी गोट्या खेळा आंदोलन–डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**





बीड शहरातील रस्त्यांवर जागोजागी कच-यांचे ढीग, पावसाळ्यात गटारीचे पाणी रस्त्यावर, अर्धवट नाल्यांची कामे,शहरात पसरलेली दुर्गंधी त्यामुळे पसरणारे साथीचे रोग,बीड शहरातील मान्सुनपुर्व स्वच्छता कामे कागदोपत्रीच करण्यात आली असुन शहरातील शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर त्यामुळे होणारे अपघात तसेच मोकाट कुत्र्यांचा चावा त्यामुळे नागरीकांचे जीव धोक्यात आदी मुलभूत प्रश्नांसाठी वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी कर्तव्यात कसूर करत कामांकडे दुर्लक्ष करत असुन नगरपरिषद प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.३० सोमवार रोजी नगरपरिषद कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड यांच्या दालनासमोर गटारीचे पाणी रस्त्यावर,' रस्त्यावर खड्डे ' नगरपरिषद प्रशासन काय करतंय गोट्या खेळतंय अशी घोषणाबाजी करत गोट्या खेळुन

लक्ष्यवेधी गोट्या खेळो आंदोलन करण्यात आले.नीता अधारे मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार ,रामधन जमाले इंटक जिल्हाध्यक्ष बीड, आपचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, शहराध्यक्ष सादेक सय्यद आदि सहभागी होते.

बीड शहरातील प्रमुख रस्त्यावरील मोकाट जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा येत असुन अपघातांचे प्रमाण वाढले आहे तर मोकाट कुत्र्यांच्या चावा घेण्याच्या घटनेने नागरिक भयभीत असुन तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी केल्यानंतर जनावरे पकडुन कोंडवाड्यात पाठवले तरी दंड ठोठावुन दुसऱ्या दिवशी सोडण्यात येतात. शहरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी करण्याबाबत दोन वेळा जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.परंतु दोन्ही वेळेस एकही निविदा प्राप्त न झाल्याने पुढील कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नीता अंधारे मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड यांनी डॉ.गणेश ढवळेंच्या शिष्टमंडळास सांगितले.

## नवा मोंढा मैदानावर लाडक्या बहिणींचा आनंद सोहळा साजरा होणार

# ७ ऑक्टोबरला नांदेडमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस,अजित पवार यांची उपस्थिती

### जिल्हा प्रशासनाकडून महिला सशक्तिकरण अभियानाची तयारी सुरु

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

संपूर्ण महाराष्ट्रातील महिला भगिनींसाठी आर्थिक सक्षमीकरणाची क्रांती ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना व अन्य योजनांचा आनंद सोहळा ७ ऑक्टोबरला नांदेडमध्ये होत आहे. मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये जिल्ह्यातील हजारो महिला सहभागी होणार असून प्रशासन या दृष्टीने तयारीला लागले आहे.



राज्य शासनाने मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान सुरू केले असून या संकल्पनेतून सर्व जिल्ह्यांमध्ये राज्य शासनाच्या पथदर्शी योजनांमधील लाभार्थ्यांची संवाद साधने व त्यांना प्रत्यक्ष या योजनाचा कार्यक्रमांमध्ये लाभ देणे सुरू आहे. विविध जिल्ह्यांमध्ये मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत कार्यक्रम झाले असून आता नांदेडमध्ये देखील ७ ऑक्टोबरला हा कार्यक्रम होणार आहे.

आज या संदर्भातील महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, यांच्यासह जिल्हा जिल्हा परिषद व महानगरपालिकेतील सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. यामध्ये विविध विभाग प्रमुखांना जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

नवा मोंढा येथील मैदानावर होणाऱ्या या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन ,महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

जिल्ह्यातील मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे त्यामुळे हजारोच्या संख्येने महिला या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. याशिवाय मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत .जिल्हा प्रशासन या मोठ्या कार्यक्रमाच्या तयारीला लागले आहे.


---

# प्रभारी नायब तहसीलदार भगवानराव बागल यांचा सेवापुर्ती निमित्त सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा | प्रतिनिधी**

मंठा तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचे प्रभारी नायब तहसीलदार भगवान श्रीपतराव बागल यांचा सेवापुर्ती सोहळा सोमवार ता. ३० रोजी तहसील कार्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला. या सेवापूर्ती व स्वागत समारंभाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार श्रीमती सोनाली जोंधळे यांची उपस्थिती होती. भगवानराव बागल यांनी सन २००५ -२०११ परतुर येथे महसूल विभागात लिपिक म्हणून काम केले, २०१२ ते २०१३ पुरवठा विभाग बदनापूर, सन २०१३ ते २०२१ आठ वर्ष परतुर येथील पुरवठा विभागात अव्वल कारकून म्हणून जबाबदारी पार पडली आणि २०२१ ते २०२४ पुरवठा विभागाचे प्रभारी नायब तहसीलदार म्हणून त्यांनी तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार आणि रेशन कार्डधारक यांच्यात समन्वय ठेवून उत्कृष्ट कार्य केले. कार्यालयात आलेल्या लोकांचे प्रश्न तात्काळ सोडविले. तहसीलदार श्रीमती सोनाली जोंधळे यांनी आपल्या भाषणात प्रभारी पुरवठा अधिकारी भगवानराव बागल यांच्या




कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी त्यांचा छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन स पत्नीक सत्कार केला. या कार्यक्रमाला राज्य मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पी बी मते, महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र शिंदे, सरचिटणीस अरुण डुकरे पाटील, माजी जिल्हाध्यक्ष व्ही डी मस्के, नायब तहसीलदार संजय शिंदे, एस पी कुलकर्णी, पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार श्री राजपूत, जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचे कोषाध्यक्ष व्यंकटेश दंडेवाड, जिल्हा पुरवठा कार्यालयातील नंदकुमार क्षीरसागर, श्री जाधव, तलाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष संजय उफाड, मंडळ अधिकारी गणेश कुलकर्णी, मंगेश देशमुख, रास्त भाव दुकानदार संघटनेचे परतुर तालुकाध्यक्ष अंकुशराव लिपणे, मंठा तालुका अध्यक्ष विठ्ठलराव काळे, सेवानिवृत्त तहसीलदार श्री फुकाटे, तहसील कार्यालयातील कर्मचारी महसूल अव्वल कारकून श्री देशमुख, श्रीमती धुमाळ, श्रीमती सरकटे, श्री काळे, भगवान खालापूरे, सचिन कळणे, श्री इंगळे, श्री आडे, श्री गायकवाड यांच्यासह मंठा आणि पुरवठा विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

---

# मा.शरदचंद्रजी पवार यांच्या उपस्थित डी.पी. आय ची महाएल्गार सभा मुंबई येथे संम्पन्न

### आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न सन्मान मिळाल्याशिवाय आमचा लढा थांबणार नाही–उषाताई चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने मुंबई येथे आयोजित केलेल्या अण्णाभाऊ साठे भारतरत्न महाएल्गार महासभेत राष्ट्रवादी काँग्रेस चे सर्वेसर्वा मा,शरदचंद्र पवार साहेब उपस्थित होते. या वेळी उद्घाटन प्रसंगी आपले विचार मांडले, शरदचंद्र पवार साहेब यांनी संगितलं की दिल्लीमध्ये महा एल्गार पुकारा मी तुमच्या पाठीशी खंबीर पणे उभा राहणार अशा पद्धतीने सूचना करत संबोधित केले. साहित्यिक थोर विचारवंत अण्णाभाऊंना साठे यांना भारतरत्न मिळणे म्हणजे त्या सन्मानाची उंची वाढवणे आहे आणि त्या साठी कधीही मुंबई नको दिल्लीत महायलगार पुकारा मी कधीही तुमच्या आंदोलनास पाठिंबा देत आपल्या सर्वा सोबत राहील असे मत मांडले, आण्णाभाऊ साठे आज सामाजिक राजकीय जात -वर्ग जाणीवेचा क्रांतिकारी साहित्यिक म्हणून देशातील कानकोपऱ्यात ओळख निर्माण आहे,यावेळी डी, पी, आय च्या जिल्हा




महिला अध्यक्षा सिनेमा अभिनेत्या उषाताई चव्हाण यांनी आपले विचार मांडले आण्णाभाऊ साठे यांचे विचार समरणात ठेवन्या सारखे असून त्याचे विचार मानवाने अंगीकारून समाजाला डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक लढ्यानी दिले फकीरा हि कादंबरी त्यांनी डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीतून अर्पण केली, महाराष्ट्राच्या सामान्य जडन घडणीत सामाजिक बदलात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे मोठं योगदान मानले जाते त्यानी ३२कादंबऱ्या १३लघुकथा संग्रह असे शेकडो कादंबरी तुन समाजात जात वर्ण भेद यातून मुक्त केले आहे, उषाताई यांनी आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न सन्मान पुरस्काराने सन्मानित केल्यावरच आमचा लढा थांबवणार असल्याचे मत डी, आय, पी च्या महिला जिल्हाध्यक्षा बीड यांनी आव्हान केले यावेळी मुंबई येथील भारतरत्न महाएल्गार सभेला उदघाटक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वे सर्वा मा, शरद चंद्रजी पवार या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष अजिंक्य भैया चांदणे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा, सुकुमार कांबळे सर अनेक मान्यवर उपस्थित होते.

---

# न.प.च्या प्रशासक/ मुख्याधिकारी व अधिकाऱ्यां सोबत बीड शहर बचाव मंचाची बैठक संपन्न

### बैठकीमध्ये बीड शहर बचाव मंचाने केला शहरातील विविध भागातील समस्यांचा लेखाजोखा सादर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

बीड शहरातील सफाई मोहीम, पाणीपुरवठा, तातडीच्या दुरुस्त्या, मोकाट जनावरे व कुत्र्यांचे स्थलांतर, नाल्यांची दुरावस्था, सीसीटीव्ही कॅमेरे अवैध होर्डिंग्ज, औषध फवारणी, उद्याने, कर्मचारी भरती, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन , नवरात्रसाठीची तयारी, धार्मिक स्थळांजवळचे रस्ते व लाईट, पथदिवे , पाणीपुरवठा, पी. टी.आर. नामांतर नोंदणी इतर नोंदणी प्रमाणपत्र कारभार , अशा अनेक विविध प्रश्नांसंबंधी बीड शहर बचाव मंच व मंचाच्या माध्यमातून जमलेल्या सामाजिक कार्यकर्ते व शहरातील प्रमुख नागरिक यांनी अगोदरच निश्चित केल्याप्रमाणे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी व इतर अधिकारी कर्मचारी यांच्यासह



तपशिलासह चर्चा- प्रश्न -उत्तरे व जबाबदारी अशा प्रकारे बैठक संपन्न झाली. मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी मात्र एक दोन अपवाद वगळता बहुतेक समस्या सोडवण्यासाठी निधी नाही, फंड नाही, शासनाकडून पैसा मिळत नाही, जिल्ह्यातील इतर तालुके व शहरांच्या तुलनेमध्ये बीडला पैसे मिळत नाहीत; हेच पालुपद गायिले. बीड शहर बचाव मंचाचे प्रमुख मार्गदर्शक डी.जी. तांदळे सर यांनी त्यांना जबाबदारीची जाणीव करून देत मंचाचे सहकार्य देवू केले. बीड शहर बचाव मंचाचे निमंत्रक नितीन जायभाये, अध्यक्ष कॉ. भाऊ प्रभाळे उपाध्यक्ष सय्यद फैयाज भाई इकबाल, सेक्रेटरी अशोकराव येडे, प्रमुख मार्गदर्शक डी जी तांदळे सर, संघटक फरहानभाई सय्यद, सहसचिव सादेकभाई सय्यद, हाफिज मोईनुद्दीन शेख, कायदेशीर प्रमुख सल्लागार ड्व्होकेट अनिल बारगजे, अॅड नितीन वाघमारे, उपाध्यक्ष परवेज कुरेशी, अमजद कुरेशी, प्राचार्य नामदेव काळे सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, डॉ. गणेश ढवळे, प्रा. व्ही.एन.सवासे, सहसंघटक शेख अमीर पाशा, शेख जहीर, एस.टी. कामगार संघटनेचे सुधीर देशमुख, अर्जुनराव उजगरे, डॉ. मसलेकर यांच्यासह अनेक जबाबदार नागरिकांनी विषयनिहाय चर्चेत सहभाग नोंदविला. नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी नीता अंधारे, इंजी. प्रमोद माने, इंजी. दत्ता व्यवहारे, बांधकाम विभागाचे कर्मचारी, स्वच्छता विभागाचे प्रमुख विश्वंभर तिडके, स्वच्छता विभागाचे एसआय. जाधव, नोंदणी विभागाचे चंदु काळे, कुलकर्णी , उपमुख्याधिकारी सम्राट कदम, औषध फवारणीचे कर्मचारी अशा अनेक कर्मचाऱ्यांनी अधिकाऱ्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

---

# दौंड तालुक्यातील विविध ठिकाणी आज आ.राहुल कुल यांच्या हस्ते होणार भूमिपूजन


### जलसंपदा विभागा अंतर्गत १४४ कोटींचा निधी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

दौंड तालुक्यासाठी जलसंपदा विभागा अंतर्गत १४४ कोटी रुपयांचा निधी मिळाला असून आज दि.०२ आक्टोंबर रोजी विविध ठिकाणी विकास कामांचे भूमिपूजन होणार असून यातील प्रामुख्याने भूमिपूजन करण्यात येणारी विकासकामे स.९ वाजता.भुलेश्वर मार्केटजवळ,यवत

यवत-दोरगेवाडी येथे कॅनॉलवर पुलाचे बांधकाम करणे १ कोटी ९ लाख, स.१० वा.जाहीर सभा विठ्ठल मंदिराजवळ,वरवंड जुना मुठा उजवा कालवा किमी ४३ ते १०९ मधील अस्तरीकरण करणे १७९ कोटी ८८ लाख, स.११:३० वा.मळद नवीन मुठा उजवा कालवा वितरिका क्र.३२ किमी १-५ ची दुरुस्ती करणे १ कोटी ३३ लाख, दु. १२ वा. लोणारवाडी नवीन मुठा उजवा कालवा भिगवण शाखा कालवा दुरुस्ती करणे किमी १ ते ३५,९ कोटी ५९ लाख, दु.१२:३० वा.जाहीर सभा छत्रपती



मंगल कार्यालय,खडकी नवीन मुठा उजवा कालवा वितरिका क्र.३५ किमी १-६ ची दुरुस्ती करणे२ कोटी ९ लाख,ईत्यादी विकासकामांचे भूमिपूजन अँड.राहुल सुभाष कुल आमदार,दौंड यांचे हस्ते संपन्न होत आहे,तरी दौंड तालुक्यातील सर्व कार्यकर्ते,आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे अवाहन करण्यात आले आहे.

---

# लोणार विकास आराखड्यात ६४ कोटी ८३ लाखांनी वाढ;आता ४३४ कोटी ६१ लाखांचा विकास आराखडा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**

**आमदार रायमुलकर यांच्या प्रयत्नांना यश**

लोणार विकास आराखड्यातील कामे गतीने पूर्ण व्हावीत यासाठी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नांमुळे आता लोणार विकास आराखड्याच्या मूळ किमतीत ६४ कोटी ८३ लाख रुपयांनी वाढ झाली असून राज्य शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे . आता लोणार विकास आराखड्याची एकूण रक्कम ४३४ कोटी ६१ लाख रुपये झाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, लोणार सरोवर जतन ,संवर्धन आणि विकास आराखडा राज्य शासनाने तयार केलेला असून त्यात सांडपाणी प्रक्रिया गटार योजना, प्रयोगशाळा स्थापन करणे ,लोणार मंठा बायपास बांधकाम करणे , इजेक्टो इ ब्लँकेट सुरक्षित राहण्यास खाजगी जमिनीचे संपादन करणे या कामांचा समावेश होता. यापैकी इजेक्टो ई ब्लँकेट खाजगी जमिनीचे संपादन या कामावर सात कोटी १४ लाखांची तरतूद होती. ही बाब वगळून उर्वरित कामांवर ६४ कोटी ८३ लाख रुपयांच्या अतिरिक्त वाढीव रकमेस मान्यता देण्यात आली आहे. ही कामे गतीने व्हावीत यासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जधव यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार संजय रायमुलकर यांनी वाढीव तरतुदीसाठी अथक प्रयत्न केले होते.वाढीव रकमेसाठी नियोजन विभागाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समिती समोर वाढीव रकमेच्या मान्यतेचा प्रस्ताव ठेवण्यात




आला होता. ५ सप्टेंबर २२४ च्या बैठकीत उच्चाधिकार समितीने शिफारस करून प्रस्तावाला मान्यता दिली आहे. मुख्याधिकारी नगरपालिका यांच्या मार्फत होणाऱ्या सांडपाणी प्रक्रिया भूमिगत गटार योजनेच्या रकमेत ३५ कोटी १९ लाख रुपयांची वाढ करण्यात आली असून आता ही योजना १०६ कोटी ७० लाखांची होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केल्या जाणाऱ्या लोणार मंठा रस्ता बायपास बांधकामावर पूर्वीची तीस कोटी ८० लाख तरतूद होती त्यात २५ कोटी २० लाखांची वाढ करण्यात आली असून या कामाची एकूण रक्कम ५६ कोटी इतकी मंजूर करण्यात आली आहे. नियोजन विभागाचे उपसचिव मिलिंद कुलकर्णी यांच्या स्वाक्षरीने ३० सप्टेंबर २०२४ रोजी याबाबतचे शासकीय परिपत्रक प्रसृत करण्यात आले आहे. महायुती सरकारच्या या निर्णयाबद्दल आमदार संजय रायमुलकर , शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

# लोहा-कंधार निवडणुकीत शिवसेनेची मशाल पेटविणार-एकनाथ दादा पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे



खोटारड्या राजकारण्याला लोहा -कंधार ची जनता १०० टक्के घरी बसविणार व येणाऱ्या निवडणुकीत शिवसेनेची मशाल पेटविणार असे प्रतिपादन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांनी लोहा येथील त्यांच्या निवडणूक कार्यालयात भरगच्च पत्रकार परिषदेत केले. दि. ३० सप्टेंबर रोजी शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांचा लोहा -कंधार मतदार संघात झंझावात दौरा झाल्यानंतर त्यांची लोहा येथील त्यांच्या निवडणूक कार्यालयात भरगच्च पत्रकार झाली. यावेळी शिवसेनेचे नांदेड जिल्हा सहसंपर्कप्रमुख ॲड मुक्तेश्वर धोंडगे, लोहा -कंधार विधानसभा प्रमुख भाऊसाहेब पाटील कदम, दत्ता भाऊ शेंबाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य बालाजी भैय्या परदेशी,तालुकाप्रमुख संजय ढाले, लोहा -कंधार विधानसभा समन्वयक सुरेश पाटील हिलाल, सुप्रसिद्ध निवेदक विक्रम कदम सर,शहरप्रमुख खंडू पाटील पवार,युवा सेनेचे जिल्हा समन्वयक योगेश पाटील नंदनवनकर, युवा सेनेचे लोहा तालुका अधिकारी गजानन मोरे, रूद्रा पाटील भोस्कर, कंधार तालुकाप्रमुख सचिन पेटकर, गजानन कराडे,आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना एकनाथ दादा पवार यांनी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर व आमदार श्यामसुंदर शिंदे यांचा खरपूस समाचार घेतला. राजकारण हे माझी उपजीविका नाही जसे येथील दाजी - भावजीची आहे. भाजपा पक्ष हा आता अस्ताला जात आहे. जो माणूस बहिणीचा होऊ शकत नाही तर इतरांचे काय. आता पर्यंत लोहा -कंधार मध्ये उद्घाटने झाली त्या कामांचे काय ती कामे झाली आहे का ? आता निघालेत निवडणूकीच्या पुढे उद्घाटन करायला. सरकार हे मराठा आरक्षण, धनगर आरक्षण या सर्व आरक्षणाबदल फेल (नापास) झाले आहे. आता जनता हे सरकार बदलणार आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यावर टीका करण्याची तुमची लायकी आहे का.आता ४० आमदार हे गद्दार झालेत त्यांच्या अगोदर तुम्ही गदार झालात असे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नाव न घेता त्यांच्यावर प्रहार केला. तसेच मी थोडा आजारी असल्यामुळे अफवा केली की हे पुण्याला गेले निघुन मी पळणारा कार्यकर्ता नाही तर लढणारा कार्यकर्ता आहे. मी येथील जनतेच्या न्याय हक्कासाठी लढणारा आहे, येथील विकासासाठी,गाव वाडी तांड्यावरील रस्त्याच्या विकासासाठी लढणारा आहे. मी यांच्यासारखा माळेगांव यात्रेतील तमाशातील सोंगाड्या नाही . त्या दोघांना जो पैशाचा घमंड आला आहे ते येथील जनता उतरवील शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांच्या सभेला माझ्या येथील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी जमवून रेकार्ड ब्रेक सभा करुन विरोधकांची बोलती बंद केली. दि. २२ सप्टेंबर रोजी मातोश्रीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत लोहा -कंधार शिवसेनेची बैठक झाली व त्यांनी सांगितले लोहा -कंधार ची जागा ही शिवसेनेची आहे व मी शिवसेना उबाठा व महाविकास आघाडीच्या वतीने १०० टक्के निवडणूक लढविणार आहे व येथील जनता ही शिवसेनेची मशाल पेटविणार आहे. विरोधात जर हिम्मत असेल तर त्यांनी चर्चा करायला कंधारच्या महाराणा प्रताप चौकात यावे. मी या जन्मभूमी मध्ये जन्मलो आहे व या जन्मभूमीची सेवा करायला आलो आहे असे एकनाथ दादा पवार म्हणाले.

### आमचा कायदा नाही तर तुमचा फायदा नाही म्हणत

# जागतिक दिव्यांग दिनी दिव्यांगांचे चले जाव आंदोलन-राहुल साळवे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

नांदेड जिल्ह्यात अपंग दिव्यांग अधिकार अधिनियम २०१६ आणि दिव्यांग व्यक्तीसाठींचे महाराष्ट्र राज्य दिव्यांग धोरण २०१८ सह शासन निर्णयांची अंमलबजावणी न करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीती नांदेड कडून ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनी तिवृ स्वरूपाचे विद्रोही आंदोलन करत आमचा कायदा नाही तर तुमचा फायदा नाही म्हणत चले जाव आंदोलन करणार असल्याची माहिती आज बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल साळवे यांनी एका प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली आहे. शासन स्तरावरून दिव्यांगांच्या कल्याण व पुनर्वसनासाठी विविध शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत परंतु स्थानिक पातळीवर त्यांची अंमलबजावणी केली जात नाही. आमदार - खासदार निधीतूनही दिव्यांगांच्या कल्याणासाठी दरवर्षी ३० लाख रुपये विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे परंतु कार्यकाळ संपत आला तरी एकाही आमदार महोदयाने हा निधी खर्च केला नाही. तसेच खासदारानेही एम्पीलैड्समधील दिव्यांगांचा दरवर्षीचा ३० लाख रुपये निधी अखर्चितच ठेवत आपला कार्यकाळ पूर्ण केला असल्याचे साळवे म्हणाले.

नांदेड शहर व संपूर्ण जिल्ह्यात दिव्यांगांवरील वाढते अन्याय अत्याचारांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना जिल्ह्यात अपंग दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ व महाराष्ट्र राज्य दिव्यांग धोरण २०१८ ची अंमलबजावणी करण्यात आली नाही. शासनाने लाडकी बहिण योजना सुरू केली त्यातून दरमहा १५०० रूपये मानधन दिले जात आहे त्याच धर्तीवर लाडका दिव्यांग योजना राबवून प्रति दिव्यांग ६ हजार रुपये प्रति महिना संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांगांना मानधन देण्यात यावे व आजवर दिव्यांगांसाठी निर्गमित करण्यात आलेल्या विविध विभागातील शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याच्या निषेधार्थ दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक दिव्यांग दिनी बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीती नांदेड कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत मोर्चा काढून काळा दिवस पाळत जिल्हा परिषद.महानगरपालिका. जिल्हाधिकारी कार्यालय. पोलिस प्रशासनसह संबंधित सर्वच शासकीय कार्यालयात जाऊन आमचा कायदा नाही तर तुमचा फायदा नाही म्हणत अधिका-यांच्या खुर्च्या जप्त करून चलेजाव आंदोलन करण्यात येणार आहे या आंदोलनात जास्तीत जास्त दिव्यांगांनी सहभागी होण्याचे आवाहन राहुल साळवेसह.देविदास बद्देवाड.फेरोज खान पठाण.प्रदिप हणवते.शेषेराव वाघमारे.विष्णु जायभाये.आनंदा माने.संतोष गज्जलवाड.कार्तिककुमार भरतीपुरम.राजु इराबत्तीन.सय्यद आरिफ.शिवाजी सुर्यवंशी.नागनाथ कामजळगे. राजकुमार देवकर.परशुराम गायकवाड.प्रशांत हणमंते.अजय गोरे.शेख आतिक.मुंजाजी कावळे.संजय धुलधाणी.हसन खान.शेख माजिद.कमलाकर टाकळीकर.शेख आलिम.राज कदम.नागेश निरडी.धर्मेंद्र नालटे.किरणकुमार न्यालापल्ली.भाग्यश्री नागेश्वर. सविता गवते. कल्पना सप्ते.मनिषा पारधेसह मुकबधीर कर्णबधिर संघटना व ब्लाईंड संघटना यांच्याकडून आज करण्यात आले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल चांडगावमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डि.लिट) यांचा१३७ वा जयंती सोहळा सोमवार दि.३०/०९/२०२४ रोजी स.१०.०० वा न्यु इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात माजी विद्यार्थी नवनियुक्त पीएसआय चांडगावचे सुपुत्र सूरज सावता चाकणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

प्रमुख पाहुणे मा.आ. बबनरावजी (दादा) पाचपुते साहेब ( (माजी मंत्री, महाराज्य) माजी आमदार राहुलदादा जगताप पा. (अध्यक्ष, K.K.J.S.S.A. पिंपळगाव वडील) (सदस्य व्यवस्थापकीय परिषद, रयत शिक्षण संस्था, सातारा. काँग्रस नेते मा. श्री. घनशाम अण्णा शेलार श्री. बाबासाहेब भोस (माननीय सदस्य, व्यवस्थापकीय परिषद, रयत शिक्षणसंस्था, सातारा) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मा.श्री. आण्णासाहेब शेलार मा.जि.परिषद उपाध्यक्ष ,मा. श्री. राजेंद्रदादा नागवडे (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अ.नगर) मा. श्री. कुंडलिकराव दरेकर(अध्यक्ष, S.M.S.N.N. S.S.A.C.)(सदस्य, जनरल बॉडी आर.एस. संस्था, सातारा.श्री. सुभाषशेठ गांधी मा.श्री. नवनाथ बोडखे (सदस्य, जनरल बॉडी आर.एस. संस्था, सातारा)(विभागीय अधिकारी, आर. शिक्षा संस्था, यू. विभाग, ए. नगर)मा.श्री. बाजीराव कोरडे(सदस्य, सर्वसाधारण संस्था रयत. शि. संस्था, सातारा) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला . यावेळी हरिश्चंद्र खामकर, तालुका अध्यक्ष प्रहार संघटना मा. श्री.राजेंद्र (आबा) भाऊ म्हस्के (स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, पांगता)मा.श्री. नामदेव आण्णा म्हस्के,मा.सौ. मनिषाताई रविंद्र म्हस्के. जमादार ए. बी. , दत्तात्रय नामदेव वाघ स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष, सदस्य स्थानिक पालक शिक्षक आजी/माजी सरपंच, उपसरपंच चेअरमन, व्हा.चेअरमन विद्यार्थी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे शेवटी ऋषिकेश दत्तात्रय दरेकर यांनी सर्वांना स्वादिष्ट अन्नदान करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# डॉ.मीना सोसे यांना वऱ्हाडरत्न पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार सरोवर । विनायक कुटे



लोणार येथील प्रसिध्द स्त्री रोग चिकित्सक व साहित्यिक डॉ मीना सोसे यांना यावर्षीचा अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंच अकोला यांच्या द्वारे राज्य स्तरीय वऱ्हाड रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे . डॉ मीना सोसे या साहित्यिक व सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत .यांच्या आजवरच्या वऱ्हाडी साहित्य लेखनाची व वऱ्हाडी भाषा जागर चळवळीतील विशेष सहभागाची नोंद घेऊन मंचाने त्यांना या वर्षीचा वर्हाड रत्न पुरस्कार जाहीर केला आहे . डॉ मीना सोसे यांचे यासाठी विविध स्तरातून अभिनंदन होत आहे . विदर्भाची मायबोली वऱ्हाडी भाषा ही विदर्भाची खरी ओळख आहे . पण आधुनिक काळात इंग्रजी भाषेच्या अत्याधिक प्रभावाने जिथे प्राकृत मराठी भाषा दुर्लक्षिली जात आहे तिथे या विविध स्थानिक भागातील बोली भाषा जसे विदर्भाची वऱ्हाडी याकडे तर वैदर्भीय जनतेचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे . यामुळे विदर्भाची शान जणू लोपत आहे .याची जाण ठेवून . वऱ्हाडी भाषेला पुन्हा जनसामान्यांच्या मनात आणि व्यवहारात स्थान मिळावे व या गोड आणि दमदार वऱ्हाडी भाषेचे जतन आणि संवर्धन करावे .या उद्देशाने अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंच अकोला गेले अनेक वर्षे काम करत आहे . मंचाचे अध्यक्ष श्याम ठक, उपाध्यक्ष निलेश कवडे व मार्गदर्शक पुष्पराज गावंडे सर यांच्या संकल्पनेतून सक्रियतेतून हा मंच भाषा संवर्धनाचे मोलाचे काम करत आहे .

# इंदापूर अर्बन बँकेचा उत्कृष्ट कामगिरी बद्दल सलग २ वर्षांसाठी झाला गौरव

## सलग दोन वर्षे शून्य टक्के एनपीए;हर्षवर्धन पाटील यांनी केले अभिनंदन!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे



पुणे येथे इंदापूर अर्बन बँकेचा सलग दोन वर्षासाठीच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव करण्यात आला.



राज्याचे माजी मंत्री व राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांचे नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या इंदापूर येथील इंदापूर अर्बन को-ऑप बँक लि.बँकेचा सन २०२२/२३ व २०२३/२४ या दोन्हीं आर्थिक वर्षासाठी शून्य टक्के एनपीएच्या सक्षम अशा उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या गुणगौरव सोहळ्यामध्ये शनिवारी (दि.२८) या दोन्हीं वर्षाकरिता २ स्मृतीचिन्हे व प्रशस्तीपत्रे देऊन गौरव करण्यात आला.

पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनचा सन २०२२/२३ व २०२३/२४ या दोन्हीं वर्षांकरिता झालेल्या नागरी सहकारी बँक गुणगौरव समारंभामध्ये हा गौरव करण्यात आला.इंदापूर तालुक्यातील युवकांना स्वयंरोजगार निर्मितीसाठी कर्ज उपलब्ध व्हावे,या उद्देशाने कर्मयोगी शंकररावजी पाटील,राजेंद्रकुमार घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली हर्षवर्धन पाटील यांनी बँकेची स्थापना केली.बँकेच्या या गौरवाबद्दल इंदापूर अर्बन बँकेचे संस्थापक व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर अर्बन बँकेचे सभासद,संचालक मंडळ, अधिकारी,कर्मचारी व हितचिंतक यांचे अभिनंदन केले. सदर गौरव समारंभ प्रसंगी राज्याचे सहकार आयुक्त दिपक तावरे,राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे,रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे,महाराष्ट्र राज्य सह बँक लि.मुंबई चे प्रशासक विद्याधर अनास्कर,पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.सदरचा पुरस्कार बँकेचे चेअरमन देवराज जाधव,व्हा.चेअरमन सत्यशील पाटील,संचालक लालासाहेब सपकाळ,तानाजी निंबाळकर,विजय पांढरे,मच्छिंद्र शेटे पाटील,सुभाष बोंगाणे,स्वप्निल सावंत,संजय जगताप,अविनाश कोतमिरे,मुख्य कार्यकारी अधिकारी विजय तावरे,वसुली अधिकारी जोतीराम जामदार यांनी स्वीकारला.

### बँक तालुक्यातील जनतेच्या दैनंदिन कामकाजाचा घटक- हर्षवर्धन पाटील

**इंदापूर अर्बन बँकेस सन २०२३/२४ या आर्थिक वर्षामध्ये ऑडिट वर्ग अ मिळाला आहे.या बँकेचे माध्यमातून हजारो कुटुंबांचे संसार उभे राहिले आहेत. इंदापूर अर्बन बँक ही तालुक्यातील जनतेच्या दैनंदिन कामकाजाचा अविभाज्य घटक बनली आहे,असे गौरवोद्गार बँकेचे संस्थापक व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी काढले.**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904